


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.३१ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056




# शरद पवारांचे मराठा आरक्षणाबद्दल केंद्राकडे बोट

## ...तसं झाल्यास आरक्षणाचा प्रश्न निश्चित सुटेल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** विविध समाजघटकांकडून आरक्षणाच्या मागण्या वाढल्या असून, मराठा-ओबीसी संघर्ष उभा ठाकला आहे. आजही आरक्षणाची आवश्यकता आहे. ही वस्तुस्थिती आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली ५० टक्क्यांची मर्यादा अडथळा ठरत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी घटना दुरुस्ती करणे आवश्यक आहे, यासाठी राज्य सरकारच्या बैठकांवर बैठका सुरू आहेत. अशी भूमिका शरद पवार यांनी अहिल्यानगर येथे एका कार्यक्रमात मांडली.




माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अरुण कडू यांच्या अमृतमहोत्सवी (७५ वर्षे) निमित्ताने येथील सहकार सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. शरद पवार म्हणाले की, छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणासाठी मराठा समाजाला आरक्षणाची दारे खुली केली. तेव्हापासून आरक्षणाच्या प्रवासाची सुरुवात झाली. मात्र, काळाच्या ओघात विविध समाजघटकांकडून आरक्षणाच्या मागण्या वाढल्या.

**शरद पवार काय म्हणाले ?**

आरक्षणाचे असे प्रश्न सोडवायचे असतील तर शेवटी राष्ट्रीय पातळीवर निर्णय घेतले गेले पाहिजेत. यामध्ये केंद्र सरकारने निर्णय घ्यावा लागेल.

जर तामिळनाडू ७२ टक्के आरक्षण देऊ शकत असेल, तर महाराष्ट्रासह इतर राज्यांनाही तो मार्ग उपलब्ध व्हायला हवा. त्यासाठी आवश्यक असल्यास घटनादुरुस्ती करावी लागेल. हा प्रश्न केवळ महाराष्ट्राचाच नाही, तर देशातील इतर राज्यांचाही आहे. त्यामुळे सर्व संबंधित राज्यांशी चर्चा करून संसदेमध्ये ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. यासाठी मी स्वतः काही सहकाऱ्यांशी बोलणी केली आहे, असे पवार म्हणाले.

शेतकरी व सैन्यात कार्यरत असलेल्या समाजघटकांसमोर हा प्रश्न गंभीरपणे उभा आहे. संसदेत जर याबाबत निर्णय घ्यायचा असेल, तर केंद्र सरकारची स्वच्छ व न्यायाची भूमिका असली पाहिजे तसे झाल्यास आरक्षणाचा प्रश्न निश्चित सुटेल असा ठाम विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

# मोटारसायकल चोरी प्रकरणात चौघा आरोपींना अटक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** चंद्रपूर शहर पोलिसांनी मोटारसायकल चोरी प्रकरणात चौघा आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. फिर्यादी महेश गौतम काळे (वय ३६, रा. माता नगर भिवापूर वार्ड, चंद्रपूर) यांनी २० ऑगस्ट रोजी पोलिसात तक्रार दिली होती की, त्यांच्या हिरो होंडा स्प्लेंडर (क्र. एम.एच. ३४-यू-५२१४) मोटारसायकलची चोरी झाली आहे. सदर वाहनाची किंमत अंदाजे १५ हजार रुपये इतकी होती. तक्रारीवरून शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासा दरम्यान गोपनीय माहिती मिळाल्यानंतर आरोपी सुमीत शांताराम अमराजवार (२८), तनवीर कादिर बेग (२५) या दोघांनी मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर आरोपी सत्तार शम्मी खान (३२, रा. पडोली) याने ग्रॅन्डर कटर मशीनच्या सहाय्याने मोटारसायकलचे तुकडे केल्याचे समोर आले. काही तुकडे त्याने स्वतःजवळ ठेवले तर काही आरोपी जाकीर कासम शेख (३१) याच्याकडे दिल्याचे उघड झाले.

पोलिसांनी या आरोपींकडून - चोरीस गेलेल्या हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकलचे तुटलेले तुकडे (किंमत १५,००० रु.) एक जुनी डिलक्स मोटारसायकलचे तुकडे (किंमत ४०,००० रु.) लोखंड कापण्याची ग्रॅन्डर कटर मशीन (किंमत २,००० रु.)असा एकूण ५७,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पो.नि. निशिकांत रामटेके यांच्या नेतृत्वात सपोनि. राजेंद्र सोनवणे, दत्तात्रय कोलते, विलास निकोडे तसेच डी.बी. पथकातील पोलीस कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

# मराठा समाजासाठी गठीत वंशावळ समितीस ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, ठाणे :** राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीस शासनाने दि.३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केला असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या २५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ही समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या कार्यकाळाला यापूर्वी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर, न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आला होता. यास अनुसरून तालुकास्तरीय वंशावळ समितीस उच्चस्तरीय समितीच्या मुदतवाढीपेक्षा किमान सहा महिने अधिक मुदत देण्याचा विचार शासनाकडून करण्यात आला होता. त्यानुसार, आता या समितीचा कार्यकाळ ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. समितीस २५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व तरतूदी लागू राहतील, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी ज्ञान आत्मसात करून जीवनाचा उत्कर्ष करा : प्राचार्य डॉ. सहदेव आहेर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** जिल्ह्यातील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे श्री ढोकेश्वर कॉलेज , टाकळी ढोकेश्वर. कॉलेजमध्ये नुकतेच विज्ञान मंडळाचे उद्घाटन मलिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलत असताना ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून महाविद्यालयात उपस्थित राहून नवनवीन ज्ञान आत्मसात करून जीवनाचा उत्कर्ष करावा असे आवाहन केले. आपल्या मनोगतात नोबेल पुरस्कारांविषयी माहिती देऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कष्ट करण्याची क्षमता आहे त्या क्षमता ओळखून विद्यार्थ्यांनी आत्मचिंतन करून आत्मविश्वासाने वाटचाल केली पाहिजे असे मत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी ए.आय, चाट जीपीटी यासारख्या नवनवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून ज्ञान संपादन करा. तसेच सायन्स असोसिएशनच्या माध्यमातून विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन इनक्युबेशन, इनोव्हेशन आणि एंटरप्रेन्योरशिप यासारख्या उपक्रमातून स्वयं रोजगार निर्माण करावा असे आवाहन केले.

# पदकविजेत्यांच्या गौरवाने पुण्यात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, पुणे :** आंतरराष्ट्रीयसह राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील ३३१ पदकविजेत्यांना रोख पारितोषिकाने गौरवित करून पुण्यात जल्लोषात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. खेलो इंडियासह आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी ५८ कोटीचा अतिरिक्त निधी मंजुर करून रोख बक्षिसे ही खेळाडूंना कष्टाला दिलेली दाद असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.



पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग सभागृहात महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते रोख पारितोषिकाने १३ आंतरराष्ट्रीय,३१८ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी मिशन लक्ष्यवेध हाय परफॉर्मन्स सेंटरच्या लोगोचे अनावरण पवार व क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळे, आमदार बाबाजी काळे, क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले, सहसंचालक सुधीर मोरे, नामदेव शिरगांवकर, संजय शेटे आदी मान्यवर उपस्थित होते.

सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचे व्दिशतक झळकावून महाराष्ट्राच्या खेळाडूंनी अभिमानास्पद कामगिरी केली असे सांगून उपमुख्यमंत्री अजीत पवार पुढे बोलले की, महाराष्ट्राच्या १३ कोटी जनतेच्या वतीने खेळाडूंचे कौतुक होत आहे.रोख पारितोषिके ही त्यांच्या कष्टाला,योगदानाला दिलेली दाद आहे.

खेलो इंडियासह इतर खेळाडूंच्या बक्षीसांसाठी ५८ कोटी अतिरिक्त निधी देण्याची क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांची मागणीही आपल्या भाषणात पवार यांनी मंजुर केली. बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात देशातील पहिले ऑलिम्पिक संग्रहालय उभा करण्याचा निर्णय घेतला आहे.खेळाडूंना संस्कार देणारे केंद्र हे संग्रहालय असेल असेही अजित पवार आपल्या भाषणात म्हणाले.

आरोग्यदायी महाराष्ट्र, क्रीडामय महाराष्ट्र हे आमचे ध्येय आहे असे सांगून असे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे राज्याचे नवे क्रीडा धोरण लवकरच विकसीत करणार आहे. खेळाडुंचा न्याय देणारे नवे क्रीडाधोरण असेल. यातून आंतरराष्ट्रीय, ऑलिम्पिक मध्ये महाराष्ट्राचे खेळाडू अधिकाधिक पदके जिंकतील.

उत्तराखंड येथे फेबुवारीत संपन्न झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रने गौरवशाली कामगिरी केली होती. ५५ - सुवर्ण, ७० - रौप्य व ७६- कांस्य अशी एकूण २०१ पदके पटकावून, सहभागी राज्यांमध्ये प्रथम क्रमांक संपादन केला. या स्पर्धेतील ३१८ पदकविजेत्या खेळाडूंना गौरविण्यात आले. सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकविजेत्यांना अनुकमे रू. ७, ५, ३ लाख रोख बक्षिस देण्यात आली राज्याच्या क्रीडा धोरण-२०१२ नुसार,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू व मार्गदर्शकांना रु.२८.७० कोटी रकमेची रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात करण्यात आला. वार्षिक रु.१६० कोटी इतका खर्च असलेल्या मिशन लक्ष्यवेध या महत्वाकांक्षी योजनेचा शुभारंभही आज करण्यात आला. पहिल्या टप्प्यातील सहा क्रीडा प्रकारांच्या प्रशिक्षण योजनेचा शुभांरभ शुक्रवारी होईल. यामध्ये ॲथलेटिक्स, हॉकी, कुस्ती, वेटलिफ्टिंग, रोईंग व लॉन टेनिस खेळाचा समावेश करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले.आभार सहसंचालक सुधीर मोरे यांनी मानले.

# दिव्यात नागरिकांची सुरक्षा रामभरोसे !

## पुलाच्या कंत्राटदार व महापालिकेच्या अभियंत्यांचे नागरिकांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष





**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, दिवा (ठाणे) :** दिवा रेल्वे स्टेशन जवळ महापालिकेच्या पूर्व -पश्चिम जोडणाऱ्या पुलाचे काम सुरू आहे. हे काम करत असताना संबंधित कंत्राटदाराकडून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कुठल्याही उपाय योजना करण्यात आलेल्या नाहीत.

काही दिवसांपूर्वी ठाणे मेट्रोचे काम सुरू असताना पुलावरून सळई पडून रिक्षात बसलेल्या एका प्रवाशाच्या डोक्यातून आरपार घुसली होती. पण या घटनेतून ठाणे महानगर पालिकेने काहीही बोध घेतल्याचे दिसून येत नाही. मुख्य रस्त्यावर पुलाचे काम सुरू असताना कंत्राटदाराने रस्त्यावरून चालणाऱ्या प्रवाशांच्या जीविताची काळजी घेणे क्रमप्राप्त असते. काम सुरू असलेल्या ठिकाणी बॅरिकेड्स, सीसीटीव्ही, सूचना फलक लावून पादचाऱ्यांना माहिती देणे बंधनकारक असते.

पुलावर काम करणाऱ्या कामगारांनी हेल्मेट, सेफ्टी बेल्ट इत्यादी साधनांचा वापर करणे गरजेचे असताना अशा कुठल्याही उपाययोजना कंत्राटदराने केलेल्या नाही. महापालिका अधिकाऱ्यांचेही याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत.

सुरक्षिततेची कुठलीही काळजी न घेणाऱ्या सदर कंत्राटदारावर याप्रकरणी सक्त कारवाई करून त्याचे कंत्राट रद्द करण्याची मागणी मनसेचे शहर सचिव प्रशांत गावडे यांनी केली आहे. यावेळी त्यांच्या सोबत उपविभाग अध्यक्ष शैलेंद्र कदम आणि शाखाध्यक्ष सागर निकम हे देखील उपस्थित होते.

## संपादकीय



### बिबट्याची डरकाळी

ऐन सणावाराच्या धामधुमीत नाशिकमध्ये हजारो लोकांच्या सहभागाने एक मोर्चा निघाला. हा जनक्षोभ होता चक्क बिबट्या आणि त्याहीपेक्षा वन विभागाविरुद्ध. नाशिकचाच एक भाग असलेल्या वडनेर परिसरात दोन-अडीच वर्षांच्या बालकाला बिबट्याने उचलून नेले. मूल दारापुढे खेळत असताना, त्याच्या जन्मदात्यासमक्षच ऐन राखीपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला ही घटना घडली.

या चिमुरड्याच्या कलेवराला त्याची लहानशी बहीण राखी बांधतानाचे दृश्य पाहून उपस्थितांचे हृदय पिळवटून निघाले. प्रसारमाध्यमांतील छायाचित्र पाहून सामान्यांच्याही डोळ्यांच्या कडा पाणावल्या. दुर्दैवाने त्याच दिवशी दिंडोरीतसुद्धा या हिंस्र श्वापदाच्या हल्ल्यात एका महिलेने जीव गमावला. या सलगच्या दोन घटनांमुळे लोकांच्या संतापाचा उद्रेक झाला. हजारो जण रस्त्यावर उतरले. त्यातून पिंजरे लावण्यासह नरभक्षी बिबट्यांना थेट गोळ्या घालण्याचीही मागणी न यावी तरच नवल!

बिबट्याला बिबट, बिबळ्या वा ग्रामीण भागात थेट 'वाघ'च म्हटले जाते. देशात सुमारे १३ हजार बिबटे असल्याचे केंद्राचा २०२३चा अहवाल सांगतो. महाराष्ट्रात मध्य प्रदेशनंतर सर्वाधिक दोन हजार बिबटे आहेत. प्रत्यक्षात त्यांची संख्या दुप्पट-तिप्पट असावी, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. राज्यात वर्षाकाठी तीस ते चाळीस बिबट्यांचा मृत्यू होतो. यापैकी बरेचसे अपघातात, तर काही शिकारीला बळी पडतात. वाघाच्या हल्ल्यात कोणी ठार होण्याच्या वृत्ताने जसा विदर्भवासीयांचा दिवस जात नाही, तसे राज्याच्या इतर भागांत बिबट्यांच्या हल्ल्याबाबत घडत असते. नाशिक परिसरात तर रोजच उपद्रव ठरलेला. या भागात ही श्वापदे पाचशेपेक्षा अधिक आहेत.

'उदंड जाहले बिबटे' अशी स्थिती असल्याने त्यांच्या हल्ल्याची आरडाओरड सतत सुरूच असते. अधूनमधून लहान मुले वा कधी मोठी माणसेही त्यांची शिकार ठरल्याच्या घटना घडतात. नाशिक-अहिल्यानगर परिसरात गेल्या वर्षात या जमातीने तब्बल तीस लोकांना ठार केले. पाळीव पशूंची हानी तर खिजगणतीतही नाही. बिबट्यांच्या दहशतीपायी शहरालगतच्या क्षेत्रांत लहान मुलांचे खेळ थांबले आहेत. माणसे सांजवेळीच्या आधीच शेतशिवारातून बाहेर पडू लागली आहेत. काही गावांत दिवसाही मुले-वयोवृद्ध मंडळी बाहेर पडत नाहीत.

बिबट्या हा प्रचंड अनाकलनीय प्राणी आहे. एक वेळ वाघाच्या वर्तनाचा अंदाज बांधला जाऊ शकतो; परंतु, बिबट्याबाबत सारेच अंदाज फोल ठरतात. तो अनेकदा पिंजऱ्यात येऊन जातो, तरी अडकत नाही. हा प्राणी अगदी सहज अधिवास बदलत असल्याने मानवाशी त्याचा संघर्ष ठरलेला. नाशिकलगत गोदावरी, दारणा, वालदेवी या नद्यांच्या काठांवर ऊस क्षेत्र वाढल्याने त्यांना लपण्यासाठी सुरक्षित जागा मिळते. 'फास्ट फूड'सुद्धा सहज उपलब्ध होते. रात्रीच्या सुमारास शहरालगतच्या कचऱ्यात कुत्री, बकऱ्या खाद्य शोधतात आणि ते आयतेच बिबट्यांचे खाद्य बनतात. जंगले कमी होतच आहेत. मात्र, तेथील शिकारीपेक्षा शहरालगत कोंबडी, डुक्कर, कुत्रे, शेळी, बकरी व इतर पाळीव प्राण्यांची शिकार बिबट्यांना सहज शक्य होते.

अलीकडे बिबट्याचीसुद्धा जीवनशैली बदलली. जन्माला येणाऱ्या बछड्यांपैकी पूर्वी एखादाच जगत असे. आता मात्र चारही बछडे जगत असल्याचा निष्कर्ष वन विभागाने काढला आहे. त्याचे जन्म, सावज शोधण्याचे प्रशिक्षण आणि मृत्यूही जंगलाऐवजी उसालगतच होत असल्याचे दिसते. खरे तर ही श्वापदे जगविताना, त्यांच्या सुरक्षित अधिवासाच्या उपाययोजना करताना, माणसांच्या जिवाला धोका होणार नाही, याचा प्राधान्याने विचार करण्याची हीच योग्य वेळ. शहरात धुमाकूळ घालणारी हिंस्र श्वापदे जगवायची की माणसे, याचेही धोरण नजीकच्या काळात ठरवावे लागेल. वन विभाग, वन्यजीवप्रेमी आणि सरकारांचे सर्वसमावेशक प्रयत्न जसे गरजेचे आहेत, तशी नागरिकांच्याही वर्तनात सुधारणा आवश्यकच. अन्यथा, कबुतरे, कुत्री, मांजरांच्या उपद्रवाच्या मालिकेत बिबट्यांचाही समावेश व्हायचा आणि आणखी कोठे त्यांना थेट गोळ्या घालण्याची भाषा केली गेल्यास पंचाईत होऊन भलतेच प्रश्न निर्माण व्हायचे!

# भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व ; प्रणव मुखर्जी

भारताचे माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचा आज स्मृतिदिन. पाच वर्षापूर्वी ३१ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता कारण प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एक ऋषितल्य व्यक्तिमत्व होते.

प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एकमेव असे व्यक्ती होते की ज्यांच्याविषयी सर्वसामान्य नागरिकांपासून ते पंतप्रधानांपर्यंत आणि सत्ताधारी पक्षांपासून विरोधी पक्षांपर्यंत सर्वांनाच कमालीचा आदर होता. भारतीय राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले प्रणव मुखर्जी यांना भारतीय राजकारणातील भीष्म पितामह म्हणावे लागेल कारण जवळपास पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी भारतीय राजकारणात घालवले. त्याचा जन्म ११ डिसेंबर १९३५ चा. त्यांचे वडील स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. त्यासाठी त्यांनी दहा वर्ष कारावासही भोगला. प्रणव मुखर्जी यांचे वडील कॉँग्रेस कमिटीचे सदस्य होते तसेच पश्चिम बंगाल विधानपरिषदेचे अध्यक्ष होते त्यामुळे लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले. प्रणव मुखर्जी यांनी कोलकाता येथील विद्यासागर विद्यापीठातून एम ए आणि एल एल बी केले. राजकारणात येण्याआधी त्यांनी काहीकाळ प्राध्यापक म्हणून नोकरी केली तर काहीकाळ पत्रकारिताही केली. पण लहानपणीच राजकारणाचे बाळकडू मिळाल्याने त्यांनी १९६९ साली राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच आपल्या वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्वाच्या जोरावर मंत्रिपदापर्यंत मजल मारली.

आपल्या तल्लख बुद्धीने आणि दूरदृष्टीने त्यांनी त्या पदावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. नियोजन आयोगाचे अध्यक्ष, राज्यसभेचे आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते, गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री तसेच विविध संसदीय समित्यांची अध्यक्षपदे अशी अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषवली. या सर्व पदांवर त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. प्रणव मुखर्जी हे त्यांच्या विविध लोकाभिमुख निर्णयाने देशभर चर्चेत राहिले. राष्ट्रपतीपद ग्रहण करण्यापूर्वीपासूनच संसदीय लोकप्रणालीत अद्ययावत माहिती ठेवणारे नेते म्हणून प्रणव मुखर्जी यांची ख्याती होती. लोकसभेत विविध पदे भूषवताना संसदेच्या आवारात अगदी विरोधी पक्षातील दिग्गज नेतेही त्यांच्याशी महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा करताना आढळत. नव्या खासदारांसाठी



त्यांचे भाषण, संसदीय आयुधे वापरून प्रश्न उपस्थित करणे हे प्रशिक्षणच होते. गृह, अर्थ, संरक्षण आणि परराष्ट्र धोरण याबाबतचे त्यांचे ज्ञान चकित करणारे होते त्यामुळेच त्यांना



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

भारतीय राजकारणात व ज्ञानी वर्तुळात संसदीय प्रणालीची एक चालती बोलती लायब्ररी संबोधले जायचे म्हणूनच राष्ट्रपतीपदी त्यांची निवड झाल्यावर एका योग्य नेत्याची निवड झाली अशीच भावना संपूर्ण देशाची झाली होती. राष्ट्रपतीपद हे घटनेतील सर्वोच्चपद आहे. या पदाला एक मान आहे, प्रतिष्ठा आहे. एक वेगळा शिष्टाचार असलेले हे पद आहे. राष्ट्रपतीपदी निवड झाल्यानंतर त्यांनी या पदाची प्रतिष्ठा वाढवण्याचेच काम केले. प्रणव मुखर्जी यांनी राष्ट्रपती पदाच्या पूर्वी लावले जाणारे म हामहीम हा शब्द न वापरण्याची प्रशासनाला सूचना केली. हे पद आणि त्याची समावेशकता वाढवण्याचा हा महत्वाचा निर्णय होता. भारतीय लोकशाहीचा इतिहास जगाला सांगणारा, जगाची भाषा समजणारा एक ऋषितुल्य वक्ता याठिकाणी विराजमान असल्याचे समाधान देशाला मिळाले. ३१ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने देशाची कधीही भरून न निघणारी हानी झाली. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व हरपले. भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व असलेले माजी राष्ट्रपती स्वर्गीय प्रणव मुखर्जी यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !

# दिव्याखाली अंधार... ...आणि बुडत्याला काडीचा आधार...

मराठी भाषेत अनेक सुप्रसिद्ध म्हणी आहेत. ह्या म्हणी अतिशय मार्मिक, खोचक आणि महत्त्वपूर्ण संदेश देतात. ज्या म्हणीचा अर्थबोध कळतो ती म्हण कायम लक्षात राहते. अशा कितीतरी म्हणी आहेत ज्या मानवी जीवनाशी निगडित आहेत आणि ह्या म्हणी मानवी जीवनातील अनेक अडचणी, प्रश्न चुटकीसरशी सोडवतात आणि कठीण परिस्थितीवर सहजतेने मात करायला शिकवतात. म्हणून फार पुर्वीपासून मानवी जीवनात विविध आणि अर्थपूर्ण म्हणींचे स्थान अबाधित व महत्वपूर्ण आहे.

एकेका म्हणीचा अर्थ समजून घेऊ लागलो की त्या म्हणी कायम लक्षात राहतात. म्हणींमुळे आपल्या मराठी भाषेचे सौंदर्य वाढते.

आम्ही भावंडं लहान होतो तेव्हा अभ्यास करताना माझी आजी पार्वतीबाई आमच्या सोबत असायची. ती आम्हाला अनेक म्हणी व त्यांचा अर्थ समजावून सांगायची. मग आम्ही एकाग्रतेने अभ्यास करायचो. अचानक लाईट गेली की बाकीचे झोपी जायचे.मी मात्र घासलेट म्हणजे रॉकेलचा दिवा पेटवायचो आणि अभ्यास करायचो. दिवा पेटवल्यानंतर तो दिवा उचलून दुसरीकडे ठेवताना लक्षात आले की खरोखर दिव्याखाली अंधार असतो.पेटता दिवा इतरांना प्रकाश देतो,हा दिवा इतरांचे जीवन प्रकाशमय करतो परंतु,त्याच्याखालचा अंधार तो कधीच नष्ट करू शकत नाही. तसेच प्रसिध्द व ख्यातनाम व्यक्तींमध्ये सुध्दा एखादा दोष असतो एखादी उणीव असते. या जगात परिपूर्ण असा कोणीही नाही.दुसरी आणखी एक म्हण आहे 'बुडत्याला काडीचा आधार'. या म्हणीचा अर्थ प्रत्यक्षात मी एकदा अनुभवला आहे. शाळेला उन्हाळी सुट्टी लागली की आम्ही आमराईत आंबे राखायला जायचो. दुपारी जवळच्या विहिरीत उतरून थंड पाणी प्यायचो. एके दिवशी पाणी पिताना लक्षात आले की एक मुंगी पाण्यात पडली आहे आणि ती पाण्यात बुडण्यापासून स्वतःला वाचवत आहे. हे लक्षात येताच मी जवळची एक गवताची काडी घेतली आणि ती गवताची काडी मुंगी जवळ धरली.ती म ुंगी लगेचच त्या काडीवर चढली. ते पाहून मला ती म्हण लगेच लख्खपणे आठवली, बुडत्याला काडीचा आधार. याचा अर्थ असा होतो की संकटात किंवा अत्यंत कठीण परिस्थितीत सापडलेल्या व्यक्तीला छोटीशी केलेली मदत सुध्दा उपयोगाची ठरते.ती लहान मदत सुध्दा त्याला खूप मोठी वाटते. परंतु, आजकाल अशी मदत करण्याची तयारी कोणी दाखवत नाही.कारण आपण सगळे स्वार्थाच्या कचाट्यात अडकलो आहोत.

मराठीत अशा अनेक म्हणी आहेत ज्या आजच्या काळाला ही तंतोतंत लागू पडतात. काही लोकांचे आडवेतिडवे स्वभाव पाहिले, असभ्य भाषा व असभ्य वर्तन पाहिले की त्यांना म्हणीच्या रुपात टोमणे मारावे वाटतात.काही वाईट लोकांना कितीही चांगले वागायला व चांगले बोलायला सांगितले तरीही ते कोणाचे ऐकून घेत नाहीत. आणि आपल्या स्वभावात बदल करत नाहीत. म्हणून अशावेळी एक म्हण लगेच आठवते- 'कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरीही ते वाकडे ते वाकडेच राहते'. याचा अर्थ असा होतो की काही लोक आपला मूळ स्वभाव कधीच बदलायला तयार होत नाहीत.आजकाल लोक इतके स्वार्थी झाले आहेत की जर तुमच्याकडे एखादे काम असेल तर

तुमच्याशी फार गोड बोलतात. आणि तुम्ही त्यांचे काम पूर्ण केल्यानंतर मात्र ते तुमची ओळखही विसरून जातात. अशा लोकांसाठी 'कामापुरता मामा आणि ताकापुरती आजी' ही म्हण प्रचलित झाली आहे.तसेच 'गरज सरो आणि वैद्य मरो' ही म्हण त्या लोकांसाठी आहे जे एखाद्याने केलेल्या उपकाराची जाणीव ठेवत नाहीत. अडचणीच्या काळात ज्यांनी मदत केली त्याची आठवण ठेवत नाहीत. ही अतिशय घाणेरडी सवय आजच्या स्वार्थी लोकांमध्ये रूढ झाली आहे.

आजच्या घडीला काही लोक स्वतः ला फार शहाणा समजतात. त्यांच्यापेक्षा शहाणा या जगात दुसरा कोणी नाही असा त्यांचा गोड गैरसमज असतो. ते चारचौघांत स्व कर्तृत्वाच्या नुसत्या बढाया मारतात. प्रत्यक्षात मात्र काहीच करत नाहीत. त्यांना त्यांच्या शहाणपणाचा गर्व झालेला असतो. पण या भ्रमात राहून ते जेव्हा त्यांचे स्वतःचे काम स्वतःच्या कर्तृत्वाने स्वतः करू शकत नाहीत तेव्हा त्यांच्या साठी काही म्हणी तंतोतंत लागू पडतात. अति शहाणा त्याचा बैल रिकामा,गर्वाचे घर खाली आणि उथळ पाण्याला खळखळाट फार या तीन म्हणी दीड शहाण्या लोकांकडे पाहून आल्या आहेत असे वाटते. काही लोक आपले उत्पन्न लक्षात न घेता वारेमाप खर्च करतात. कधी कर्ज काढतात आणि सण उत्सव दणक्यात साजरे करतात. त्यामुळे कर्ज वेळेवर फेडता येत नाही. चक्रवाढ व्याजाच्या चक्रव्यूहात रुतून बसावे लागते. कर्जाचा डोंगर वाढत जातो. हताश आणि निराश व्हावे लागते. अशा लोकांनी,'अंथरुण पाहून पाय पसरावे' ही म्हण कायम लक्षात ठेवावी.अनाठायी व बिन कामाचा खर्च करू नये. व्यसनी लोकांच्या संगतीत राहिल्यास माणूस व्यसनी बनतो. एकदा एखादे व्यसन जडले की जीवनाचा सत्यानाश झाल्याशिवाय ते सुटत नाही.अशा लोकांसाठी ह्या दोन म्हणी फीट बसतात. ढवळ्या शेजारी पवळ्या बांधला वाण नाही पण गुण लागला आणि जित्याची खोड म ेल्याशिवाय जात नाही.

आजच्या आधुनिक काळात बरेच आईवडील बारशाला आपल्या लहान मुलांम ुलींचे नामकरण करताना मनात आले ती नावे ठेवतात. त्या नावाचा अर्थ व आपल्या बाळाचा स्वभाव हे लक्षात न घेता आधुनिक नावे ठेवतात. नाव भारी भारी ठेवतात पण ते मुलगा व मुलगी त्या नावाला साजेसे वर्तन करत नाहीत, नावाला साजेसे कर्तृत्व करत नाहीत.अशा लोकांना 'नाव सोनुबाई आणि हाती कथीलाचा वाळा' ही म्हण योग्य वेळी आठवली तर फार बरे होईल. आपण पहातो की काही लोक भ्रष्टाचार करून व अफरातफर करून अमाप पैसा कमावतात. पण हा पैसा पचनी पडत नाही.असा हरामाचा पैसा कमावणाऱ्या लोकांना कोणतीतरी मोठी व्याधी जडते. तिच्या उपचारात घपळा करुन मिळवलेला सगळा पैसा खर्च होतो. अशा लोकांना म्हणीच्या रुपात संदेश द्यावा वाटतो की 'हपापाचा माल गपापा' किंवा 'जसे कराल तसे भराल!'

आणखी अशा अनेक म्हणी आहेत ज्यांनी मनुष्य जीवनातील सत्यता विषद केली आहे.ह्या म्हणी खूप आहेत पण तुर्तास आजच्या लेखात एवढ्या म्हणी पुरेशा आहेत. बाकीच्या म्हणी तुम्ही आठवा आणि त्यांचा अर्थ समजून घ्या.त्या म्हणी ऐकून एक विलक्षण आनंद मिळतो एवढे मात्र नक्की!

- बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.

## भरधाव एसटीची धडक
## ज्येष्ठ पत्रकाराने जागीच सोडले प्राण

**दि.३०, बारामती :** ओंकार आचार्य आणि त्याच्या मुलींचा वेगवान वाहतुकीच्या अपघातात बळी गेल्यानंतर एक महिनाही उलटत नाही. तोच पुन्हा एकदा बेदरकार वाहतुकीने बारामतीमध्ये आज पुन्हा आजोबा आणि नातीला लक्ष्य केले आहे. यामध्ये पत्रकार असलेल्या आजोबांचा मृत्यू झाला आहे. तर, खेळांम ध्ये अनेक विक्रम केलेली नात गंभीर जखमी झाली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

**बसची दुचाकीला जोरदार धडक,
आजोबांचा मृत्यू...**

आज सकाळी बारामती निरा रस्त्यावर शारदानगर येथे हा दुर्दैवी अपघात घडला. बारामती आगाराची राज्य परिवहन महामंडळाची बस दुचाकीला धडकल्याने सकाळी पावणे सात वाजता झालेल्या या अपघातामध्ये फलटण येथील ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र दिनकर भागवत (वय ५९ वर्ष रा. गोखळी ता. फलटण) यांचा जागीच मृत्यू झाला.

## गणेश गौरी...

एकसंधीपाहुणचारा
खुले अनेक दरवाजे
जेष्ठाकनिष्ठा स्वागत
गं सनई चौघडे वाजे

भारावलेलाआसमंत
सुखे आले गण राजे
गरीबाघरी दिपावली
महा ऐश्वर्य हे विराजे

कला सक्त श्री कृपेने
कर्कशा सुरमई वाजे
जीवन करी तालबद्ध
टाळ मृदुंग अन् झांजे

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

जमेलतसा सण करी
पेलत संसाराचे ओझे
संतुष्ट साध्या भोजना
भाग्य उजळता माझे

प्रसादार्थ लहान पंगत
साधेभोजवाढतालाजे
ढेकरदेती भक्त तृप्तते
समाधान न अन्य दुजे

तुम्हीचंदेता शक्ती देवा
नीतपरिस्थितीशीझुंजे
जड हृदय निरोप देता
का अक्षआसवा भिजे

**हेमंत मुसरीक, पुणे
मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## भिवंडी तालुक्याचा अभिमान; प्रा.सचिन भोईर यांना मेक्सिको विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट पदवी




**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.३०, भिवंडी (ठाणे) :** भिवंडी तालुक्यातील पहारे (सुपेगांव) येथील सुपुत्र प्राध्यापक सचिन अशोक भोईर यांना युनिव्हर्सिटी ऑफ तोलोसा, मेक्सिको या नामांकित आंतरराष्ट्रीय विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट (विद्यावाचस्पती) ही उच्च पदवी प्रदान करण्यात आली आहे. नुकताच सोलापूर येथे एका भव्यदिव्य आणि दिमाखदार सोहळ्यात, अनेक मान्यवर आणि प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

प्रा.सचिन भोईर हे विधीतज्ञ, बुद्धिमान, झोकून देऊन कार्य करणारे, सुविचारी आणि सदाचारी व्यक्तिमत्व म्हणून सर्वश्रुत आहेत. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रात देखील त्यांचे मोलाचे योगदान आहे. ते मागील १५ वर्षांपासून अनंत लक्ष्मण पाटील मास्टर कनिष्ठ महाविद्यालय, काल्हेर (ता.भिवंडी) या नामांकित संस्थेत प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांसाठी विविध व्याख्याने, मार्गदर्शन शिबिरे, समुपदेशन यांसारखे उपक्रम राबवून त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांचे करिअर घडवले आहे.कायदेशीर सल्ला–मसलत आणि मार्गदर्शनाच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी मेक्सिको विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट सारखा मानाचा बहुमान दिला आहे. या गौरवाबद्दल शाळेचे अध्यक्ष राजू पाटील यांनी डॉ. सचिन भोईर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना म्हटले की, सरांनी मिळवलेली ही पदवी केवळ त्यांच्या कर्तृत्वाची नाही, तर आपल्या संस्थेची आणि पंचक्रोशीची शान आहे. या यशामुळे परिवारासह पंचक्रोशीतील सर्व समाजबांधवांमध्ये आनंदाची लहर आहे. डॉ.सचिन भोईर यांनी भविष्यातही शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात योगदान देत राहावे आणि अधिकाधिक यश संपादन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जिल्हा क्रीडा संकुलात श्रीरंग आप्पांच्या तैलचित्राचे अनावरण



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.३०, सातारा :** ऑलम्पिक वीर साताऱ्याचे पैलवान श्रीरंग आप्पा जाधव यांचे कुस्ती क्षेत्रातील कार्य हे अतुलनीय आहे आजच्या पिढीला त्यांचे हे राष्ट्रीय स्तरावरील योगदान जिल्हा क्रीडा संकुलातील तैलचित्रामुळे प्रेरणादायी होत राहीलअसे प्रतिपादन राष्ट्रीय कुस्तीपटू पैलवान बजरंग कदम यांनी केले. जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर यांच्या सहकार्याने ऑलिंपिक वीर पै.श्रीरंग जाधव यांचा जन्म शताब्दीपूर्तीनिमित्त जिल्हा क्रीडा संकुलात तैलचित्राचे अनावरण दिवंगत पैलवान श्रीरंग जाधव यांच्या पत्नी सुभद्रा जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी बजरंग कदम यांनी आपल्या भावना प्रकट केल्या.

## विष्णुनगर पोलीस ठाण्याचा गणेशोत्सवी रूट मार्च संपन्न



**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.३०, डोंबिवली (ठाणे) :** गणेशोत्सव व गणेशमूर्ती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विष्णुनगर पोलीस ठाण्याच्या वतीने आज दुपारी भव्य रूट मार्च काढण्यात आला. सायंकाळी ५ ते ६.१० या वेळेत झालेल्या या रूट मार्चमध्ये कोपर ब्रिज चौकी – जोंधळे चौक – दीनदयाळ चौक – दीनदयाळ रोड – सम्राट चौक – नाना शंकर शेठ पथ – गोपी चौक – गुप्ते रोड – मच्छी मार्केट – स्टेशन रोड – दीनदयाळ चौक – कोपर ब्रिज चौकी असा विस्तृत मार्ग समाविष्ट होता.

या रूट मार्चसाठी पोलीस स्टेशनमधील तसेच बाहेरील बंदोबस्ताचे मिळून १० अधिकारी, ३४ पुरुष अंमलदार, १५ महिला अंमलदार व १६ होमगार्ड सहभागी झाले होते. या उपक्रमाचे नेतृत्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम चोपडे यांनी केले तर संपूर्ण रूट मार्चदरम्यान पोलीस निरीक्षक (गुन्हे) गहिनीनाथ गमे यांनी मार्गदर्शन केले. गणेशोत्सव काळात शहरातील शांतता, सुसंवाद आणि सुरक्षिततेचे वातावरण टिकवण्यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळा उत्साहात संपन्न




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२९, नांदेड :** जिल्ह्यातील लोहा तालुक्यांतील मारतळा येथील मामा मंगल कार्यालयात आम्ही वारकरी परिवार सेवाभावी संस्थेकडून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी सांगता सोहळा संपन्न झाला. गेल्या ८ वर्षांपासून आम्ही वारकरी परिवाराच्या माध्यमातून घर तिथे ज्ञानेश्वरी! घरोघरी ज्ञानेश्वरी या उपक्रमाच्या माध्यमांतून आज पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रभर १०५०० साधकांना मोफत ग्रंथ देऊन पारायण करण्यास बसविले.

या पारायण सोहळ्याचा सांगता सोहळा अनेक साधुसंतांच्या उपस्थितीमध्ये मामा मंगल कार्यालय मारतळा येथे पार पडला. परंतु नांदेड जिल्ह्यांमध्ये सर्वत्र ढगफुटी आणि मुसळधार पाऊस सुरू होता. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुद्धा आम्ही वारकरी परिवारावर प्रेम करणाऱ्या अनेकांनी पावसाची पर्वा न करता अनेक तास रस्त्यावर वाहने उभी करून पाऊस ओसरण्याची वाट पाहून पारायण स्थळ गाठलं आणि पारायण सोहळा ठरल्याप्रमाणे शोभायात्रा, ज्ञानेश्वरी पारायण साधुसंताचे मनोगते व महाप्रसाद घेऊन अतिशय उत्साहात सांगता सोहळा संपन्न केला. या कार्यक्रमासाठी विशेष म्हणजे तेलंगणाभूषण गुरुवर्य नारायण महाराज मधापुरीकर, गुरुवर्य देवगिरीजी महाराज गुरुवर्य प्रयागगिरीजी महाराज उपस्थित होते.

## महाबळेश्वर मध्ये अन्न व औषध प्रशासनाची धाड ११,८८० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत चौघाना अटक



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२९, महाबळेश्वर (सातारा) :** दि.२९ दुपारी ३ ते ५ च्या दरम्यान अन्य व औषध प्रशासनाच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी टाकलेल्या धाडीमध्ये ४ पानटपरीमधून साधरण ११,८८० किमतीचा विक्रीसाठी बंदी असलेला गुटखा व सुगंधी तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला आहे.

अधिक माहिती अशी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकारी प्रियांका नामदेव वाईकर यांच्या खबरीवरुन महाबळेश्वर मधील विविध ठिकाणी प्रशासनाच्या वतीने अचानक धाड टाकण्यात आली ज्यामध्ये बिलाल निजाम बेपारी , मोहम्मद रफिक युसुफ मुलाणी,मसीर मकबूल बेपारी, रिझवान रियाज मेमन यांच्या दुकानातून विमल पान मसाला, रजनीगंधा,आर.एम.डी,एम.गोल्ड टोबॅको,हिरा पान मसाला ई.विक्रीसाठी प्रतिबंधीत असलेला साधारण ११,८८० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चौघांनाही अटक करण्यात आली आहे.

महाबळेश्वर पोलीस ठाण्यात गु.र.नं.७३/२०२५मध्ये भा.न्या.सं.२०२३चे कलम २२३,२७४,२७५,१२३.

अन्नसुरक्षा व मानदे२००६ चे कलम २६(२)२७(३)व कलम ३०(२) आणि अन्नसुरक्षा मानदे (प्रोहिबीशन व रेस्ट्रीक्शन ऑन सेल्स २०२२ चे नियमावली ३,१,७, व कलम ५९ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक रौफ इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉंस्टेबल संतोष शेलार करीत आहेत.

## ओडिशा राज्यातून विक्रीसाठी आणलेला १२१ किलो गांजा पकडला

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई ; दोन आरोपींसह ८१ लाखांचा मुद्देमाल ताब्यात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** ओडिशा राज्यातून अमली पदार्थांची तस्करी करून जिल्ह्यांमध्ये होलसेल गांजा पुरवणार्या टोळीचा पर्दाफाश करत ८१ लाखांचा मुद्देमाल स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जप्त केला आहे. १२० किलो गांजासह दोघा आरोपींना अटक करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार अमली पदार्थ विरोधी विशेष मोहिम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली दोन विशेष पथके तयार करण्यात आली आहे.

२९ ऑगस्ट रोजी पथकाला दोन इसम एका ट्रकने ओडीसा राज्यातुन विक्रीसाठी आणलेला गांजा शेंडी बायपास मार्गे आणत असल्याची माहिती मिळाली. पथकाने त्यानुसार पथकाने शेंडी बायपास रोडवरील हॉटेल किनाराजवळ सापळा रचला. काही वेळातच संशयित ट्रक (क्र. एम एच १४. झी.यु २१११ ) त्या ठिकाणी दाखल झाला. ट्रक थांबवून त्यातील नवनाथ अंबादास मेटे (रा. श्रीगोंदा) व ज्ञानेश्वर दत्तात्रय फुंदे (रा. मळेगाव) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. तपासादरम्यान, ट्रकच्या केबिनवरील टपावर लपवून ठेवलेल्या सहा गोण्यांमध्ये ३० लाख २२ हजार रुपये किमतीचा गांजा आढळून आला.

आरोपीकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सदरचा गांजा साथीदारांसह तो विक्रीकरीता आणला असल्याची कबुली दिली. याप्रकरणी नवनाथ अंबादास मेटे ( रा. ढोरजे, ता. श्रीगोंदा), ज्ञानेश्वर दत्तात्रय फुंदे ( रा. मळेगांव, ता. शेवगांव ) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक अनंत सालगुडे करत आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या पथकातील पोलिस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, राजेंद्र वाघ, पोलिस अंमलदार अतुल लोटके, गणेश लोंढे, संतोष खैरे, दिपक घाटकर,फुरकान शेख यांच्यासह पथकाने बाजावली आहे.

## अजित पवारांवर कांद्याची माळ फेकण्याचा प्रयत्न




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या दिशेने कांद्याची माळ फेकण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी, पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलं असून ते संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे तत्कालीन युवक अध्यक्ष सूरज चव्हाण यांच्याकडून लातूरमध्ये संभाजी ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षांना मारहाण करण्यात आली होती. त्यामुळे, संभाजी ब्रिगेडचे समर्थक अजित पवारांच्या राष्ट्रवादीवर संतापले आहेत.

श्रीगोंदा येथे शेतकरी मेळाव्यात बोलतांना अजित पवारांना कांद्यावर बोलण्याची विनंती करण्यात आली होती.

मात्र, अजित पवारांचे भाषण सुरू असताना काही कार्यकर्ते हातात कांद्याची माळ घेऊन आले होते. त्यावेळी, एका कार्यकर्त्याने हातातील माळ गरागरा फिरवत अजित पवारांकडे फेकण्याचा प्रयत्न केला. मात्र, वेळीच तेथील एकाने संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यास रोखले. त्यानंतर, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे आणि तालुका अध्यक्ष नाना शिंदे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. संभाजी ब्रिगेडच्या समर्थकांकडून कांद्याचे दरासंदर्भात अजित पवारांना बोलण्याची विनंती करण्यात आली होती.

मात्र, कांद्या संदर्भात अजित पवारांनी आपल्या भाषणात शब्दही न बोलल्याने भाषणाच्या शेवटी अजित पवारांकडे कांद्याची माळ फेकण्याचा प्रयत्न केला गेला. दरम्यान, कांद्याचे दर घसरल्याने शेतकऱ्यांचे व कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे, कांद्याच्या दरावर सरकारने काहीतरी मार्ग काढावा, अशी भूमिका संभाजी ब्रिगेडने घेतली आहे.

## नगर तालुक्यातील विकासकामांचा अनुशेष भरून काढणार - आ. काशिनाथ दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** नगर आणि पारनेर तालुक्यातील जनतेने आपल्यावर आणि महायुतीवर विश्वास दाखवून मला विधानसभेत पाठविले आहे. त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही. फक्त पारनेरच नव्हे तर नगर तालुक्यातील विकासकामांचा अनुशेष आगामी काळात भरून काढला जाईल, असे प्रतिपादन पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी केले.

नगर तालुक्यातील घोसपुरी येथे स्मशानभूमी शेड (अंदाजित रक्कम १० लाख), घोसपुरी ते घुटेवाडी रस्ता डांबरीकरण (२० लाख), या दोन्ही कामांचे भूमिपूजन आ. दाते यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.२९) झाले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी उद्योजक दिलिप दाते, पंचायत समितीचे माजी सभापती अशोक झरेकर, सरपंच किरण साळवे, माजी उपसरपंच प्रभाकर घोडके, आबा घोडके, सुहास लांडगे, अशोक हंडोरे, पोपट झरेकर, दत्तात्रय हंडोरे, सुभाष ईधाते, सुभाष झरेकर, मिठू झरेकर आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार काशिनाथ दाते यांनी नगर तालुक्यात २७ मे रोजी झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे वाहून गेलेले रस्ते, पुल तसेच इतर नुकसान मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. त्या कामांसाठीचे प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहेत. या दुरुस्ती कामांना मोठ्या प्रमाणावर निधी मिळावा यासाठी आपण शासनस्तरावर पाठपुरावा करत असल्याचे सांगितले. लवकरच या कामासाठी निधी उपलब्ध होईल असेही दाते म्हणाले.

## पालम तालुक्यात दुर्दैवी घटना ! शेतातून परतणारा युवक लेंडी नदीच्या पुरात वाहून गेला.




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.३०, पालम (परभणी) :**

पालम तालुक्यातील मौजे खोरस येथील परमेश्वर साहेबराव खंडागळे वय २५ वर्षे हा युवक काल दिनांक २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता च्या दरम्यान शेतातून घरी परतत असताना दुर्दैवाने लेंडी नदीत पाय घसरून पडल्याने पुराच्या पाण्यात वाहून गेला असल्याची घटना घडली या घटनेची माहिती मिळताच गावकरी व पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम सुरू केली. मात्र अंधार दाटल्याने शोधकार्याला अडथळा निर्माण झाला त्यामुळे आज दि.३० ऑगस्ट रोजी सकाळी गंगाखेड व पुर्णेची आठ जणांची टीम सकाळी ७ वाजल्यापासून बोटीद्वारे शोधमोहीम राबविण्यात आली.परंतु सायंकाळी ६ वाजेपर्यंत काहीच थांगपत्ता लागलेला नव्हता. सदरील ठिकाणी गंगाखेड चे उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर हे स्वतः घटना स्थळी हजर राहून शोधकार्यवर नियंत्रण ठेऊन होते.तसेच पालम चे तहसीलदार उषाकिरण शृंगारे, पालम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे, नायब तहसीलदार भागवत तेलभरे, मंडळ अधिकारी आलेवाड व साहेबराव चिकटे, महसूल अधिकारी शिवप्रसाद वायवळ,तलाठी शुभांगी आडे, तसेच माधव कांबळे, महिपती कांबळे,सुनील चव्हाण, लक्ष्मण जाधव, देवानंद शिनगारे व इतर तहसीलचे कर्मचारी,पोलिस कर्मचारी उपस्थित होते. तसेच शोध मोहीमेत अग्निशमन दल गंगाखेड व अग्निशमन दल पूर्णा तसेच शोध कार्य टीम मधील राम विलास खंडेलवाल, श्याम जगतकर, श्रीकांत साळवे, अभिषेक साळवे, सुरज खंडेलवाल, आकाश लव्हाळे, सिताराम भेंडेकर, राज पैठणी, सोनाजी खिल्लारे राजेश चावडीया यांनी शोधण्याचा सायंकाळी सहा वाजेपर्यंत आटोकाट प्रयत्न केला पण शोधकार्यात यश आले नाही.

या घटनेमुळे खोरस गावात हळहळ व्यक्त केली जात असून गावावर व परिसरात शोककाळा पसरली आहे.

